# मुंबई विद्यापीठ

**अत्यंत तातडीचे**

क्र.वि.नि.वि.वि/२३५/१४/२०१५,
मुंबई – ४०० ०३२,
२१ डिसेंबर २०१५,

परिपत्रक:—

प्राचार्य, सर्व संलग्नित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र अनुदानित /विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयाचे/संस्था तसेच अशासकीय/अनुदानित महाविद्यालये, यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा–१९९४ अंतर्गत तरतुदीनुसार तसेच केंद्र शासनाच्या मानव संसाधन व मनुष्यबळ विकास विभाग, नवी दिल्ली आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक दर्जा सुधारणे व गुणवत्ता अबाधित राखणे या धोरणाच्या अनुषंगाने शासनाने भर दिलेला आहे, हे आपणांस विदित आहेच व त्या अनुषंगाने राज्यातील सर्व अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन होण्याच्या दृष्टीने दि. ३० व ३१ मे २०१५ मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व विभागीय सहसंचालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. (सोबत सहज संदर्भाकरिता शासनाचे परिपत्रक क्र. सहसं/उशि/कोविप/नॅक मुल्यांकन/२०१५/३४४४, दि. ३० नोव्हेंबर २०१५ जोडत आहे.)

ज्या ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत नॅक मुल्यांकनाची कार्यवाही सुरू केली नाही, तसेच ज्यांनी ज्यांनी प्रथम मुल्यांकनानंतर ५ वर्षांनी पुर्नमुल्यांकनाची कार्यवाही सुरू केलेली नाही अशा महाविद्यालयांनी त्वरीत नॅक मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करून घेण्यासाठीचे प्रस्ताव लवकरात लवकर सक्षम प्राधिकरणाकडे पाठवावेत व त्या संदर्भातील अहवाल मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांचेकडे सादर करावे.

तसेच आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, ज्या महाविद्यालयांना किमान ६ वर्षे पूर्ण झालेली आहेत त्या त्या महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन करून घेणे अनिवार्य आहे, अन्यथा अशा संस्था महाविद्यालयांचे असंलग्निकरन (Deaffiliation) कार्यवाही सुरू करण्याचा निर्णय विद्यापीठ स्तरावर घेण्यात येईल.

...२/–

उपरोक्त महाविद्यालयांच्या प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की, विद्यापीठात माहिती सादर करताना खालील तक्यात माहिती पाठवावी.

| संस्थेचे तसेच महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालय सुरू झाल्याचे वर्ष | अनुदानित/विनाअनुदानित | नॅक मुल्यांकन केल्याचे वर्ष व सोबत प्रमाणपत्र विद्यापीठास सादर करणे |
|---|---|---|---|

तसेच ज्या ज्या महाविद्यालयांनी मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन संदर्भातील माहिती विद्यापीठास यापूर्वी सादर केलेली आहे, त्या महाविद्यालयांनी, त्यांची माहिती पुन:श्च सादर करण्याची आवश्यता नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

21.12.2015

मुंबई – ४०० ०३२
21 डिसेंबर २०१५

प्रा. (डॉ.) अनिल पाटील
संचालक, बि.सि.यु.डी.,
मुंबई विद्यापीठ

प्रत :–

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना.

(1)

# महाराष्ट्र शासन


विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०.


क्र. सहसं/ उशि/ कोविप/नॅक मुल्यांकन/२०१५/ ३४४४ दिनांक- ३०/११/२०१५

**परिपत्रक**

**तात्काळ/ प्राधान्याने**


UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/ECO/2015-16
0 8 DEC 2015
41136


P-A400R

प्रति,
प्राचार्य,
सर्व अधिनस्त शासकीय/अशासकीय अनुदानित
कायम विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान
तसेच विधी व अध्यापक महाविद्यालये,
जिल्हा - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

विषय:- ज्या अशाकीय अनुदानित/ कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करून घेतले नाही त्या महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस देणे.

संदर्भ:- १. मा. संचालकांचे पत्र क्र. उशिसं/२००९/नॅक माहिती/साशि/४/५२९०, दिनांक ०१.१२.२००९
२. शासन निर्णय क्र. बैठक/२००९/१३५/९/समन्वय, दिनांक १२.०९.२००९
३. शासन निर्णय क्र. एनजीसी-२००९/ (३०१/०९)/ मशि-४, दिनांक २५.०९.२००९
४. शासन निर्णय क्र. एनजीसी-२००८/(४७/०८)/ मशि-३ दिनांक ३१.०१.२००९
५. शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१०/ (२०/१०)/ विशि-३, दिनांक ०८.१०.२०१०
६. मा. संचालकांचे पत्र क्र. एनजीसी-२०१५/बैठक/मवि/२-३/८४७७, दिनांक २६.०८.२०१५ व क्र. ममअ-ब/२०१५/बैठक/सहसं// प्रशा-१, दि. २०.११.२०१५
७. या कार्यालयाचे पत्र क्र. सहसं/ उशि/ नॅक मुल्यांकन/ कोविप/ २०१४/२१७८, दिनांक ३१.१२.२०१४

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्र. ३, ४ व ५चे तसेच मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कडील संदर्भिय पत्रांचे तात्काळ प्राधान्याने अवलोकन करावे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-१९९४ अंतर्गत तरतुदींनुसार तसेच केंद्र शासनाच्या मानव संसाधन व मनुष्य बळ विकास विभाग, नवी दिल्ली आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक दर्जा सुधारणे व गुणवत्ता अबाधित राखणे या धोरणाच्या अनुषंगाने शासनाने मर दिलेला आहे, हे आपणास विदीत आहेच व त्या अनुषंगाने राज्यातील सर्व अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन होण्याच्या दृष्टीने दिनांक ३० व ३१.०५.२०१५ रोजी मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व विभागीय सहसंचालकांची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमधील महाविद्यालयांकडून नॅक मुल्यांकन संदर्भात संस्था/

महाविद्यालयांकडून दाखविण्यांत येत असलेली उदासिनता निदर्शनास आणली असता, मा. संचालक महोदयांनी या प्रकरणी तीव्र चिंता व नाराजी व्यक्त केली असून, याबाबत प्रत्येक महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन होण्याच्या दृष्टीने समयबध्द कार्यक्रम आखण्यांत यावे, असे सर्व विभागीय सहसंचालकांना सांगण्यांत येऊन निर्णय घेण्यांत आला आहे.

या आधीही विद्यापीठे आणि संस्था/ महाविद्यालयांकडून शैक्षणिक हिताच्या कारणास्तव अनेक महत्वपूर्ण बाबींकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जात असल्याची, बाब ही दिनांक १५.११.२००८ रोजी मा. राज्यपाल महोदयांच्या अध्यक्षेखाली झालेल्या व सर्व कुलगुरूंच्या झालेल्या J. B. V. C. च्या बैठकीत देखील निदर्शनास आलेली होती. त्यावेळी देखील मा. राज्यपाल महोदयांकडून तीव्र खंत व्यक्त करण्यांत आलेली होती. त्यामुळे महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन/ पुर्नमुल्यांकन करण्याबाबत ज्या-ज्या संस्था/ महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्था प्रमुख हे टाळाटाळ करतील, अशा संस्था/ महाविद्यालयांचे असंलग्निकरणाचा (Deaffiliation) कार्यवाही सुरू करावी. असा ही शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यांत आलेला आहे. तरी याबाबत आपणांस म्हणजेच ज्या-ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत नॅक मुल्यांकनाची कार्यवाही सुरू केली नाही, किंवा ज्यांनी-ज्यांनी प्रथम मुल्यांकनानंतर ५ वर्षांनी पुर्नमुल्यांकनाची कार्यवाही सुरू केली नाही अशा महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाकडे मा. संचालक, उच्च शिक्षण यांचे मार्फत शिफारस करण्यांत येईल याचीही संबधित संस्था/ महाविद्यालयांनी व्यक्तीशः गांभियाने नोंद घ्यावी.

तसेच सोबत जोडण्यात येत असलेल्या तक्ता क्र. १ व तक्ता क्र. २ मधील माहिती भरून विनाविलंब दिनांक ०३.१२.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ई-मेल व्दारे व हस्तपोच प्रतिनिधीव्दारे या कार्यालयास तात्काळ सादर करावे.

RBhosley
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,कोकण विभाग,पनवेल.

प्रत:-

१. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - १.
२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०२१.तसेच कुलसचिव, एस. एन.डी. टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर. तसेच त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या विद्यापीठांशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या तात्काळ निदर्शनास आणावी. याबरोबरच उपरोक्त प्रकरणी गंभीर स्वरूपाच्या झालेल्या दिरंगाईस संबंधित संस्था/ महाविद्यालयास जबाबदार धरण्यांत येऊन शासनाच्या प्रचलित नियमानुसार कारवाई का करण्यांत येऊ नये असे आपल्या स्तरावरून विद्यापीठ संलग्नित सर्व संबंधित संस्था/ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.